.नं. २०८७
१९२०

ा—पुष्प ३ रें.

# जनाचे श्लोक.



"...जन्मसिद्ध हक आहे."

REFBK-0001798
REFBK-0001798

... आणे.

राष्ट्रवैभव-काव्यमाला पुष्प ३ रें

# जनाचे श्लोक.

( कवि–वसंतविहार. )

प्रकाशकः—पांडुरंग विनायक जोशी,

ठाणें

REFBK-0001798

REFBK-0001798

मुद्रकः—गोपाळ विनायक रत्नपारखी,

रत्नपारखी आणि कंपनी, ११९ खेतवाडी मेन रोड

मुंबई नं. ४.

१९२०

किंमत २ आणे.

१७९८

शाखा

# स्मृति व समर्पण.

२०.का.न्यां.
२६४०

( शालिनी )

अस्ता गेली मंगळा पेशवाई
राष्ट्रज्योति क्षीण हो त्याच ठाईं
वाटे दैवी लाधली आंगलाई
लीला तीच्या आर्यभू सर्व पाही ॥ १ ॥

ऐसे कोणी लाल तेव्हां कवीचे
चित्तें ज्यांचीं दास त्या मोहिनीचे
त्या पक्षाची मोहिनी घालवाया
केले यत्नां कष्टवोनी स्वकाया ॥ २ ॥

जे जे झाले वीर ऐसे पुढारी
त्यांचीं चित्रें रंगवीं मी न सारीं
सर्वां चित्रां वर्णितां ग्रंथ नाना
चित्रांमाजी चित्र दावी जनांना ॥ ३ ॥

ज्याच्या साठीं विष्णु वैकुंठ सोडी
भूमातेच्या पोटिं येण्यांत गोडी
मेणाच्या ज्या बाहुल्या त्या जनांत
त्यांना देई वज्रता तत्क्षणात ॥ ४ ॥

तोडी बंधा जो निबंधास्त्र सोडी
जोडी देशा लेखसूत्रांत गोडी
शिष्या त्याचा बाळ सर्वांगुणाचा
ज्याची वाचा प्राण हो भारताचा ॥ ५ ॥

ज्याच्या जन्में भाग्य रत्नागिरीस
पुण्यग्रामा लाभला तो परीस
गुंडा झाला पुत्र गंगाधराला
झेंडा लागे सर्वही भूतळाला ॥ ६ ॥

बाल्यीं ज्याच्या बाललीला पहातो
झाला स्वर्गी हर्षिता चित्तिं धाता
प्रेमें देवी ठेवि सारस्वतांची
बाळाच्या ती सूक्ष्म देहांत साची ॥ ७ ॥

रा०काव्य
२५८४



सूक्ष्मीं जें तें स्थूल देहांत साचें
रोमीं रोमीं ऐक्य घोषेंच नाचें
त्या घोषाचें वेड लावी न अन्य
यासाठीं तो 'बाळ' हो "लोकमान्य" ॥ ८

स्वार्थत्यागी कोण ऐसा जगांत
यद्दिवृत्ता विश्व हें सर्व गात
पार्थासाठीं ईश योगीश कृष्ण
आर्यावर्ती तोच हो बाळकृष्ण ॥ ९ ॥

धैर्याचा जो मेरु डंकाच गाजे
तेजें त्याच्या लुप्त खद्योतराजे
संधा ज्याची "हक्क माझा स्वराज्य"
तत्वासाठीं भोग ज्या सर्व त्याज्य ॥ १० ॥

देशासाठीं जाइ कारागृहांत
लोकांसाठीं हो विदेही जनांत
सत्यासाठीं झुंज घे संकटांशीं
ऐक्यासाठीं हो जगाचा प्रवासी ॥ ११ ॥

तत्वज्ञानी अन्यदेशीय ज्याला
मोठ्या प्रेमें अर्पिती पुष्पमाला
गीतार्थाला दाविती अन्तरांती
दावा ऐशा ज्या रहस्यास देती ॥ १२ ॥

बाणा ज्याचा कर्मयोगांत जागा
धैर्यें शौर्यें जो जनां होय राणा
शीर्षी नाहीं तो किरीट प्रभूच्या
शासी चित्ता नित्य तो भारताच्या ॥ १३ ॥

मंदालेचा न्याय होता गृहांत
न्यायाधीशा हास्य आलें मनांत
बोले वक्ता बाळ गंभीर वाणी
न्यायाधीही थक्क देखूनि राणी ॥ १४ ॥

हातीं घेई कार्य जें दत्तकाचें
केलें न्यायें पूर्ण लोकांत साचें
न्यायागारीं कष्टला देह त्याचा
जिंकी भूपा अंतिं कोल्हापुराच्या ॥ १५ ॥

वर्णायाला सर्व त्याच्या गुणांला
वाटे अल्प जाहली वर्णमाला
रत्नांमाजी रत्न जें मूल्यवंत
नेलें कालें आज तें हाय! हंत! ॥ १६ ॥

आतां ऐसा भारताला धुरीण
स्वार्थत्यागी कोण पावित्र्यपूर्ण
ज्याच्या छत्रीं एक हो लोकशाही
शोधा शोधा वीर तो कोणताही ॥ १७ ॥

---

( मालिनी )

तिलक तिलक साचा आर्यभूचारु-भाला
नृपति अनभिषिक्त क्षोणिधृष्टीं जहाला
तिलक तिलक ऐसें बोल तूं लोकशाही
पुनरपि तिलकाचें ब्रह्म येईल देहीं ॥ १८ ॥

( गीति )

वार्णि 'वसन्तविहार' प्रभु तिलकाचें चरित्र आजि थोडें
कोण कवीश्वर ऐसा उकली जें घातलें जना कोडें १९
हृदयास पीळ पडतां आले उद्गार काय बाहेर
स्वकृति समर्पित तत्पदि राष्ट्रास रम्य माहेर ॥ २० ॥

---

शाखा

# जनांचे श्लोक

(भुजंगप्रयात.)

स्वयंभू असा शंभु राणा विराजे
यशाचा नगारा त्रिलोकांत गाजे
सदा देत कैवल्य कैलासधामीं
जनांसाठिं त्याचा नगाधीश नामी ॥ १ ॥

अनेका गुणांच्या फुलांचे फळांचे
जिथें वृक्ष आहेत होतात साचे
जिथें वल्लरी पुष्पिता रम्य भारी
सुगंधें जयांच्या सुखी देवनारी ॥ २ ॥

जिथें निर्झरांचें सुधेच्या समान
जनासाठिं होई जळाचें सुदान
खगांचा सुखें गातसे गीत मेळा
जनासाठिं सार्था कृतीचीच वेळा ॥ ३ ॥

जिथें अंशुमालीकरस्पर्श झाला
स्वयें मानसीं हर्ष हो अंबुजाला
सहस्त्रा दलांचीं मरंद्मगरें तीं
जनांसाठिं हसार्थ कीं सार्थ होतीं ॥ ४ ॥

जिथें खेळती लाडके इन्द्र-दंती
करावा सुखें स्पर्श त्यांना महंतीं
अहंता जयांची गळाली गळाली
जनांसाठिं हा जन्म विद्या मिळाली ॥ ५ ॥

जिथें बैसती स्कंधिं येवोनि पक्षी
महंताचिया गाति हें धाम लक्षी
जयें सोडिला स्वार्थतेचा पसारा
लता घालिती पल्लवीं त्यास वारा ॥ ६ ॥

करी हिंस्र कोणी पशू अंगसंग
महंताचिया तो सुखीं होय दंग
तपोनी जयांनीं तपें घालवीलीं
जनांसाठिं हा जन्म विद्या मिळाली ॥ ७ ॥

जनांसाठिं जेवी जनांसाठिं बोले
जनांसाठिं हाले जनांसाठिं चाले
कधींही न रागी सदा जो विरागी
जनांसाठिं झाला महा कर्मयोगी ॥ ८ ॥

जनांच्या पदीं कंटकें मार लागे
तरीही जयाच्या मनीं दुःख वागें
जनांच्या हितें तृप्ति ज्या भोजनाची
अहोरात्र चिंता जनांची जनांची ॥ ९ ॥

महा शड्रिपू बंदिशाला तयांची
जनांवास तेथें असें पाहतांची
कराया तयां मुक्त जो सिद्ध झाला
वदा कर्मयोगी तयाला तयाला ॥ १० ॥

जिथें जन्म झाला तिला जन्मदेला
महापुण्य भूमीस सद्वैभवाला
समर्पावया सिद्ध नानाप्रकारीं
करीं घे ध्वजा कर्मयोगी विचारी ॥ ११ ॥

जगीं जन्मलेल्या जना हक्क काय
कुणाची असे ही अलौलीक काय
मनोरे कुणासाठिं हे वैभवाचे
करी पूर्ण कल्याण बोलोनि वाचे ॥ १२ ॥

महा संकटांशीं कशी झुंज घ्यावी
वरिष्ठा प्रतिष्ठा कशी दाखवावी
किती तेज आहे स्वयंभु प्रभेचें
कृतीचे जनां पाठ दे शर्मदेचे ॥ १३ ॥

नभीं चंद्रतारा गभस्ती जनार्थ
महीपृष्ठ दे धान्य तैसें जनार्थ
फुलांतें फलांतें तसे वृक्ष देती
जनांसाठिं साऱ्या नद्या वाहताती ॥ १४ ॥

निसर्गांतला बोध साधाच ऐसा
तयाला न शाला न लागेहि पैसा
जसा भाव ज्याचा तसा बोध त्याला
कृती होय कल्याणदायी जनांला ॥ १५ ॥

अमर्याद तो नाद लागे जनांचा
असंभाव्य तें काव्य बोलेहि वाचा
अकल्याण कल्याण कोठें जनांचें
स्वयें शोध दे बोध निःस्वार्थतेचे ॥ १६ ॥

अशक्तास आत्मा न लाधे कदाही
असा बोध सर्वां जनां देत राही
स्वकीयानुभूतिप्रभावास दावी
किती थोरवी त्या जनाची वदावी ॥ १७ ॥

धरी पुष्पहारापरी जो भुजंगा
बलानें करी सिंहदंतालिभंगा
पृथक् व्यक्तिचे संघ निर्मोनि दावी
जनांच्या हितासाठिं हो कृत्य भावी ॥ १८ ॥

जनांसाठिं संसार हा सर्व जाणा
जनांसाठिं तो साधुचा सर्व बाणा
जनांसाठिं पेठा जनांसाठिं पंथ
जनांसाठिं झाला सुविद्या अनंत ॥ १९ ॥

जनांसाठिं नाना पुरें पट्टणें तीं
तशा चंद्रशाला विशाळाहि होती
हुडे राजवाडे जनांसाठिं तेही
जनांसाठिं यानें विमानेंहि पाहीं ॥ २० ॥

जनांसाठिं राजे जनांसाठिं राज्य
जनीं भोगणें सौख्य तेंहि विभाज्य
नको भेद येथें नको येथ दावा
जयाचा तयें भाग सौख्यंच घ्यावा ॥ २१ ॥

स्वदेशाभिमानी स्वराज्याभिमानी
स्वधर्माभिमानी स्वकर्माभिमानी
स्ववंशाभिमानी स्वभूपाभिमानी
जनांसाठिं हो कर्मयोगी इमानी ॥ २२ ॥

जनांसाठिं कारागिरी कारखानें
जनांसाठिं नानाकळाभिज्ञ जाणे
जनांसाठिं यंत्रालयें छापखानें
जनांसाठिं सेना तसे तोफखानें ॥ २३ ॥

नसें विश्व हें एकट्याचे कुणाचें
समस्तां जनां हक्क एक्या गुणाचे
जसें ज्ञान ज्याचें तसा हक्क त्याचा
पुढारी पहा कर्मयोगी जनांचा ॥ २४ ॥

झुगारा दुरी शृंखला षड्रिपूंच्या
लढाहो चमूच्यासवें त्या कलींच्या
करीं दुर्ग घ्या मुक्तिचा, इन्द्रहस्तीं
उमाळ्यावरीं भारतीं ये गभस्ती ॥ २५ ॥

जनांसाठिं वक्ता जनांसाठिं भाषा
तसे वेष नाना जनांसाठिं भूषा
जनांसाठिं तीं नाटकें सद्रसाचीं
जनांसाठिं ती मल्लविद्या गुणाची ॥ २६ ॥

जसें बोलणें त्यापरी वागणारा
जना होतसे तो कृतीचा इषारा
वृथा मेघ कोणी नभीं गर्ज गर्जतात
असे लोक कोणी जगीं वागतात ॥ २७ ॥

अशांच्या पुढें जन्मही घालविला
वृथा काल गेला वृथा जन्म गेला
परीक्षा करावी जनांची जनात
पुढें वागणें तें धरावें मनात ॥ २८ ॥

महावीर गंभीर जो निश्चयाचा
जयाच्या मनीं हेतु वागे जनांचा
पुन्या निश्चयाची जना देइ संथा
जना दाखवी कर्मयोगी सुपंथा ॥ २९ ॥

ध्रुवासारिखा पूर्ण सत्याग्रहाचा
पडो वज्र डोंई चळेनाच वाचा
दुभंगो मही वीज तीही कडाडो
त्यजी न व्रता व्योम तेंही धडाडो ॥ ३० ॥

असे भक्त जेव्हां जनीं जन्म घेती
समस्तां जनां दाखला दाखवीती
असे ईश्वरी तेज आहे कुणांत ?
जयाच्या कृतीनें सुखी लोक होत ॥ ३१ ॥

विवेकाविणें जो करीनाच कार्य
विवेकेंच जो तोषवी सर्व आर्य
जपोनी विधीनें स्वतां गुंफिलेला
जनां कर्मयोगी गुणांचाच झेला ॥ ३१ ॥

जनांच्या चकोरां दिसे चारुचंद्र
जनांच्या सुरांना गमे भूप इंद्र
जनांच्या सतारींत तें एक गीत
जनांच्या मुखीं ईश्वरी मंत्र पूत ॥ ३३ ॥

जनांसाठिं घेई उडी सागरांत
जनांसाठिं सानंद कारागृहांत
जानांसाठिं होई जगाच्या प्रवासी
जनाच्या हिताचा कन्हय्या विलासी ॥ ३४ ॥

जनांसाठिं घाला खिशामाजी हात
जनांसाठिं सोडा कशाचीहि गांठ
जनासाठिं ठेवाहि वाडा गहाण
जनांसाठिं मांडा सदुत्साह ठाण ॥ ३५ ॥

कवींनों तुह्मीं गा जनांसाठिं गीतें
लिहा लेखकांनों तुम्हीं सार्थ वृत्तें
हरीचे हराचे कुणी दास प्यारे
तुम्ही कीर्तना घ्या जनांच्याच सारे ॥ ३६ ॥

किती घ्याल फेरे किती खाल गोते
कधीं व्हाल जेते कधीं व्हाल शास्ते
नको वैरिणी ती दिरंगाइ आतां
प्रयत्नास लागा पुढें ईश नेता ॥ ३७ ॥

फलाची जरी आस आधीं कराल
कसे सागरीं संसृतीच्या तराल
निराशा नसावी दुराशा नसावी
सदाशा जनांची जनां मुक्ति दावी ॥ ३८ ॥

जनांसाठिं व्हावा जनीं ऐक्यभाव
दयेनें प्रभूही त्वरे घेत धांव
सदा आळवा त्या महाराजयाला
नृपांच्या नृपाला जगद्वर्धनाला ॥ ३९ ॥

जनांच्या यशाचें खरें मूळ जेथ
जनांच्या गुणांचें असें बीज जेथ
जनांच्या फलाचा सुमंदार जेथ
बना कर्मयोगी करा वास तेथ ॥ ४० ॥

सुवर्णाचिया होति खाणी अमूप
हिरे माणिकांनीं तसे पूर्ण कूप
जनां धान्य देई धना देश देतो
भिकारी परी कर्मयोग्याविणें तो ॥ ४१ ॥

जगीं जोंवरी जीव हा मानवाचा
जनांच्यापरी पाहिजे यत्न त्याचा
अशक्तास धक्का सशक्तास मान
असें कर्मयोगी बजावीत जाण ॥ ४२ ॥

जनांसाठिं तूं भारता जाहलास
अनंता अशा संपदेचा विलास
जगन्मान्य त्या मुक्तिचा कोहिनूर
विराजो शिरीं पाहुंदे लोक नूर ॥ ४३ ॥

धरी जो भुजंगाप्र कंठीं जनांत
करी वर्धनाला गुणांचे गुणांस
जनांसाठिं ही गुंफिली श्लोकमाला
सुगंधास देवो सदाही जनांला ॥ ४४ ॥

( स्वागता. )

कल्पवृक्ष तळिं जी बसलेली
देवता जनमनीं ठसलेली
छेडिते मधुर गाउनि तारा
नादमोहन " वसन्तविहारा "॥ ४९ ॥

REFBK-0001798
REFBK-0001798
१७९८



ही पुस्तकें **भावे आणि मंडळी,**
ठाकुरद्वार मुंबई नं. २ येथें विकत मिळतील.